महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका, मुख्य इमारत
शिवाजी नगर पुणे – ४११००५
Email id : mco@punecorporation.org
फोन क्र. ०२०- २५५०११००
जावक क्र. मआ/साप्रवि/२९३४
दिनांक : ०३/०८/२०२०

## आदेश

विषय :- पुणे महापालिका क्षेत्रा मधिल – प्रतिबंधित क्षेत्रा बाहेरील(Outside Containment Zone) निवासी व्यवस्था प्रदान करणारे हॉटेल्स,लॉजेस, अतिथीगृह, इ. आणि मॉल व मार्केट कॉम्प्लेक्स मधिल व्यवसायां मुरु करण्या करिता बाबतच्या अटी

संदर्भ :- १) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७

२) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५

३) महाराष्ट्र कोव्हिड-१९ उपाययोजना नियम,२०२०

४) महसूल व वन विभाग आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग आदेश क्र.डीएमयु/२०२०/प्र.क्र./९२/डी आयएसएम-१ दि.०६जुलै २०२०.

५) महसूल व वन विभाग आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग आदेश क्र.डीएमयु/२०२०/प्र.क्र./९२/डी आयएसएम-१ दि.२९ जुलै २०२०.

६)मा.आयुक्त,पुणे महापालिका यांचे आदेश,जा.क्र.मआ/साप्रवि/२९२, दि.३१.०७.२०२०

राज्य शासनाच्या संदर्भ क्र.५ च्या आदेशाने संदर्भ क्र.६ अन्वये आदेश निर्गत करण्यात आले आहेत ,सदर आदेशात मी, विक्रम कुमार, आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे संदर्भ क्र.४ अन्वये पुढील प्रमाणे सुधारित करीत आहे.

१) केवळ प्रतिबंधित क्षेत्रा बाहेरील (Outside Containment Zone)लॉज,गेस्ट हाऊस,अशी निवासी सुविधा पुरविणारे हॉटेल

व्यवसायांकरिता काही अटींच्या आधारे निर्बंध **दि.०५.०८.२०२०** पासून शिथिल करण्या बाबत सुधारणेचे आदेश निर्गत करीत आहे.

निवासी व्यवस्था प्रदान करणारे हॉटेल्स,लॉजेस, अतिथीगृह, इ. व्यवसायांकरिता सोबत जोडलेल्या अटींच्या आधारे निर्बंध शिथिल करण्यात येत आहेत. हे व्यवसाय त्यांच्या एकूण क्षमतेच्या केवळ ३३% क्षमता सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-१** मधिल अटींच्या आधारे वापरू शकणार आहेत.

वर नमूद व्यवसायाच्या ठिकाणी जर महानगरपालिकेचे क्वारनटाईन केंद्र म्हणून वापरात असेल तर त्या कारणाकरिता वापर पुढे सुरु राहील,त्याच प्रमाणे उर्वरित भागापैकी किवा उर्वरित पूर्ण ६७% भाग महानगरपालिका क्वारनटाईन केंद्र म्हणून वापरू शकेल.

२) **तसेच संदर्भ क्र.६ अन्वये निर्गत आदेशात दि.०५.०८.२०२० पासून केवळ प्रतिबंधित क्षेत्रा बाहेरील (Outside Containment Zone) मॉल व मार्केट कॉम्प्लेक्स सुरु करण्या बाबत नमूद केले आहे ,** ते सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-२** मधिल अटींच्या आधारे वापरू शकणार आहेत.

वर नमूद सुधारणा शिवाय संदर्भ क्र. ६ मधील उर्वरित बाबी मध्ये कोणतीही सुधारणा नाही.

हा आदेश आज दिनांक ०३ ऑगस्ट २०२० रोजी माझ्या सही शिक्याने दिला आहे.

(स्थळ प्रतीवर मा.आयुक्त यांची स्वाक्षरी असे)

सही/-
(विक्रम कुमार)
महापालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका, पुणे

सहपत्रे: अ) परिशिष्ट-१ व २

प्रत -१) मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे
२) मा. पोलीस आयुक्त,पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे.
३) मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे.

यांचेकडे माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित

०३/०८/२०२०

(अनिल मुळे)
उप आयुक्त (सा.प्र.)
पुणे महानगरपालिका, पुणे

## परिशिष्ट-१

कंटेनमेंट झोन मधील निवासी व्यवस्था प्रदान करणारे हॉटेल्स,लॉजेस, अतिथीगृह, इ. पूर्णपणे बंद राहतील तर केवळ कंटेनमेंट झोन बाहेरील क्षेत्रातील निवासी व्यवस्था प्रदान करणारे हॉटेल्स,लॉजेस, अतिथीगृह इ.खालील अटींच्या अधिन राहून सुरु राहतील.

निवासी व्यवस्था प्रदान करणारे हॉटेल्स,लॉजेस, अतिथीगृह, इ. यांनी व्यवसाय करतांना विचारात घ्यावयाच्या **अटी व शर्ती** :

**अ) सर्व व्यावसायिकांनी खालीलप्रमाणे अतिरिक्त व्यवस्था करावी.**

- सर्व व्यावसायिकांनी दर्शनी भागात कोविड – १९ या रोगाच्या अनुषंगाने नागरिकांनी घ्यावयाच्या खबरदारीबाबत वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांचे फलक / पोस्टर्स लावावेत.
- सर्व व्यावसायिकांनी त्यांचे हॉटेलमध्ये, पार्किंगमध्ये व आवारात गर्दी होणार नाही याबाबत योग्य ते नियोजन करावे. तसेच बैठकव्यवस्था व रांगेत उभे राहताना सुरक्षित अंतर राहण्याकरिता विशिष्ट अंतरावर खुणा कराव्यात.जेणेकरून सार्वजनिक ठिकाणी सामाजिक अंतर राहील.
- रिसेप्शन टेबलच्या जागे भोवती सुरक्षिततेकरिता काचेचे आवरण असावे व प्रवेशद्वारावर थर्मल स्कीनिंग ची व्यवस्था असावी.
- ग्राहकांसाठी हात सॅनिटायझ करणेकरिता पायाद्वारे नियंत्रित होणारे सॅनिटायझर स्टॅन्ड हे रिसेप्शन, अतिथीगृह व हॉटेलच्या आवारात सहज उपलब्ध असावे.
- योग्य ती वैयक्तिक सुरक्षित साधने जसे फेस मास्क, हातमोजे, इ. व्यावसायिकांनी कर्मचा-यांना व ग्राहकांना उपलब्ध करून द्यावे.
- ग्राहकांना हॉटेलमध्ये प्रवेश देताना / बाहेर पडताना व हॉटेलमध्ये असताना इतर सुविधांकरिता QR Code, Online Forms, Digital Payment जसे ( E-WALLET) इ. साधनांचा वापर व्यावसायिकांनी प्रत्यक्ष संपर्क टाळण्यासाठी करावयाचा आहे.
- हॉटेलमध्ये वापरात असलेले उदवाहक (LIFT) वापरतेवेळी त्यात विशिष्ट अंतर राहील या दृष्टीने ग्राहकांची संख्या निश्चित करावी.

- हॉटेल, अतिथीगृह, लॉज, इ. ठिकाणी असलेली वातानुकुलित व्यवस्था यांचे व्यवस्थापन हे केंद्रीय लोक निर्माण विभाग (CPWD) यांनी नेमून दिलेल्या निकषानुसार करण्यात यावे. ( Devices should be in the range of 24-30 celsius, and relative humidity should be in the range of 40-70 %, intake of fresh air should be and cross ventilation should be adequate.)

**ब) अतिथी :**

- कोविड-१९ ची लक्षणे नसणाऱ्या व्यक्तींना प्रवेश द्यावा.
- अतिथींनी प्रवेश करताना व तेथे व्यतीत केलेल्या कालावधीत आपला चेहरा मास्क अथवा तदनुषंगिक आवरणाने झाकणे आवश्यक आहे.
- अतिथींबाबत ओळखपत्रासह, प्रवासाची माहिती,आरोग्याची स्थिती, स्वयंघोषणापत्र ही माहिती रिसेप्शनवर भरून घेणेकरिता योग्य ती सोय करावी.
- अतिथीने आरोग्य सेतू ॲप वापरणे बंधनकारक आहे.
- गृह व्यवस्थेच्या सेवा सिमित ठेवणेसाठी येणाऱ्या अतिथींना या बाबत प्रोत्साहित करावे.

**क) सुविधांचा वापर :**

१) वर नमूद उपाहारगृहांसाठी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे तंतोतंत पालन करावे.

- सामाजिक अंतर राहील अशाप्रकारे बैठक व्यवस्था करावी.
- ई-मेन्यू, एकदा वापरता येणारे कागदी रुमाल (Diposable Paper Napkins) यांच्या वापरास प्रोत्साहित करावे.
- उपहारगृहांत बसून खाद्यपदार्थ खाणे या ऐवजी रुममध्ये सेवा, पार्सल सेवा यासाठी येणाऱ्या नागरिकांना प्रोत्साहित करावे.
- अतिथीगृह येथील रहिवासी अतिथींनाच केवळ उपहारगृहामध्ये प्रवेश द्यावा.

२) गेमिंग आर्केड / लहान मुलांची खेळाची जागा / जलतरण तलाव / व्यायामशाळा इ. सोयीसुविधा बंद ठेवाव्यात.

३) हॉटेल, अतिथीगृह, लॉज येथील आवारात मोठ्या प्रमाणात सभा, समूह संघटन, बैठका याला प्रतिबंध करण्यात यावा. मात्र सभागृहाच्या क्षेत्रानुसार ३३% व जास्तीत जास्त १५ सदस्यांचा सहभाग असलेला बैठकांना परवानगी देण्यात यावी.

**ड) स्वच्छता, सफाई आणि निर्जंतुकीकरण :**

- ग्राहक हॉटेलमधून बाहेर पडल्यानंतर त्या खोलीतील सर्व पडदे, चादर व इतर तदनुषंगिक गोष्टी बदलणे व सदरची खोली ही किमान २४ तासांसाठी रिकामी ठेवावी.
- आवारातील स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याचे ठिकाण, हात धुण्याचे ठिकाण यांची स्वच्छता, सफाई व निर्जंतुकीकरण वेळोवेळी करण्याची दक्षता घ्यावी.
- विश्रामगृह तसेच सार्वजनिक क्षेत्रात वापरात असलेले दरवाज्याच्या कड्या, उद्ववाहक / लिफ्ट ची बटणे, रेलिंग, आसन व्यवस्था याची स्वच्छता, सफाई व निर्जंतुकीकरण वेळोवेळी करण्यात यावे. (निर्जंतुकीकरणकरण्यासाठी १% सोडियम हायपोक्लोराईट चा वापर करावा.)
- सर्व स्वच्छतागृह सोयी स्वच्छता, सफाई, निर्जंतुकीकरण हे वेळोवेळी सखोलरित्या करण्यात यावे.
- कर्मचारी व अतिथी यांनी वापरलेले फेस मास्क / हातमोजे यांची विल्हेवाट व्यवस्थितरित्या लावणे आवश्यक आहे.

**(ई) संशयित अथवा कोरोना बाधित व्यक्ती आढळल्यास करावयाची कारवाई.**

- अशा आजारी व्यक्तीचे एखाद्या खोलीत / जागेमध्ये अन्य व्यक्ती पासून विलगीकरण करावे.
- याबाबत जवळच्या हॉस्पिटल अथवा जिल्हा / राज्य नियंत्रण कक्षाकडे त्वरित संपर्क साधावा.
- सदर बाबत संबंधित यंत्रणेकडून जोखमीचे मूल्यमापन करून संबंधित आजारी व्यक्तीच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींचा आढावा घेऊन पुढील उचित कार्यवाही केली जाईल.
- एखादा व्यक्ती कोरोना बाधित सापडल्यास सदरचे आवार निर्जंतुकीकरण करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

## परिशिष्ट-२

### कोरोना प्रतिबंधा बाबत मॉल व्यवस्थापनाने घ्यावयाची दक्षता:

कंटेनमेंट झोन मधील शॉपिंग मॉल पूर्णपणे बंद राहतील तर केवळ कंटेनमेंट झोन बाहेरील क्षेत्रातील शॉपिंग मॉल खाली अटींच्या अधिन राहून सुरु राहतील.

कोविड-१९ चा प्रादुर्भाव टाळण्या साठी खालील उपाय योजना करणे आवश्यक राहील,यांची अंमलबजावणी योग्य प्रकारे होण्या साठी कर्मचारी आणि ग्राहकाने कटाक्षाने दक्षता घेणे गरजेचे राहील.

या मॉल मध्ये काम करणारे कर्मचारी आणि येणारे ग्राहक यांच्या बाबत खालील प्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक आहे

- दोन व्यक्ती मधील अंतर शक्यतो सहा फुटाची असणे आवश्यक आहे
- प्रत्येकाने मास्कचा वापर करणे बंधनकारक आहे
- हात अस्वच्छ जरी दिसत नसले तरी साबणाने दिवसातून ३ वेळेस किमान ४० ते ६० सेकंद पर्यंत धुणे आवश्यक राहील , तसेच अल्कोहोल आधारित सॅनिटायझर ने किमान २० सेकंद हाताची स्वच्छता करणे आवश्यक राहील.
- खोकला येताना किंवा शिंकताना संबंधित व्यक्तीचे तोंड आणि नाक हे झाकले असणे आवश्यक आहे.तसेच मास्क किवा डिस्पोजेबल रुमाल वापरल्यास त्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावणे देखील आवश्यक आहे.
- मॉल मध्ये असलेल्या/येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने स्वतःच्या तब्येतीकडे लक्ष देणे आवश्यक आहे तसेच कुठल्या प्रकारचा आजार आल्यास तो तात्काळ त्याने राज्य आणि जिल्हा आरोग्य सहायक कक्षास कळला पाहिजे.
- कुणासही थुंकण्यास पूर्णपणे प्रतिबंध असणे आवश्यक आहे.
- मॉल मध्ये असलेल्या/येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने आपल्या मोबाईल मध्ये आरोग्यसेतु चा वापर करणे आवश्यक आहे.

**प्रत्येक शॉपिंग मॉलने खालील प्रकारची व्यवस्था त्यांच्या मॉलमध्ये ठेवणे आवश्यक आहे.**

I. मॉलमध्ये प्रवेशाच्या वेळी प्रत्येक व्यक्तीचे थर्मल स्क्रीनिंग झाले पाहिजे तसेच त्यांचे हात सॅनिटायझर चा वापर करून स्वच्छ करणे आवश्यक राहील.

II. ६५ वयोगटा पेक्षा अधिक वय असलेल्या, आजारी व्यक्ती, गरोदर महिला, १०वर्षापेक्षा कमी वय असलेली मुले यांना केवळ आरोग्य विषयक कारणाशिवाय प्रवेश देऊ नये,तसेच ज्या ग्राहकाला कोरोना विषयक कोणतीही लक्षणे दिसत नाहीत अशाच व्यक्तीला प्रवेश द्यावा.

III. मॉल मध्ये काम करणारे कर्मचारी किवा येणारा ग्राहक याने मास्कचा / फेस शिल्ड वापर करणे आवश्यक आहे तसेच त्यांनी मॉलमध्ये असेपर्यंत पूर्णपणे मास्क / फेस शिल्ड वापरणे आवश्यक राहील.

IV. मॉल च्या प्रमुख आणि दर्शनी भागात covid-19 प्रतिबंधक उपाया बाबत जन जागृतीसाठी पोस्टर लावणे आवश्यक आहे.

V. शक्य असेल तिथपर्यंत येणारे ग्राहक हे टप्प्याटप्प्याने आत सोडावेत.

VI. मॉल च्या व्यवस्थापनाने जास्तीचे कर्मचारी लावून मॉल मध्ये असलेल्या व्यक्तींमध्ये सुरक्षित अंतर राखले जाईल यावर लक्ष ठेवावे.

VII. ज्या कर्मचाऱ्यांचे वय जास्त आहे, गरोदर महिला कर्मचारी आहेत किंवा ज्या कर्मचाऱ्यांवर वैद्यकीय उपचार सुरू आहेत अशांनी जास्तीची काळजी घेणे आवश्यक आहे शक्यतो त्यांना समोरच्या भागात (Front Desk) काम देण्यात येऊ नये जेणेकरून येणाऱ्या ग्राहकांची त्यांचा कमीतकमी संपर्क येईल तसेच शक्य असेल अशावेळी सदरच्या कर्मचाऱ्यांना घरी राहून काम करता येऊ शकेल हे पहावे.

VIII. मॉल परिसरात आणि पार्किंग लॉट मध्ये• गर्दीवर नियंत्रण ठेऊन सुरक्षित अंतर राहिल हे व्यवस्थापनाने बघणे आवश्यक राहील.

IX. ज्या मॉलमध्ये Valet Parking ची व्यवस्था आहे अशा ठिकाणी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांने हात मोजे आणि मास्क याचा वापर करणे आवश्यक आहे, तसेच वाहनाचा दरवाजा, स्टिअरिंग आणि किल्ली याचे योग्य प्रकारे निर्जंतुकीकरण केले जाईल या कडे लक्ष देणे आवश्यक राहील.

X. मॉलमध्ये आणि परिसरात ग्राहकांमध्ये पुरेसे सुरक्षित अंतर राखले जाईल त्याकरता आवश्यक त्या ठिकाणी समजुतीच्या खुणा करणे आवश्यक राहील.

XI. शक्यतोवर ग्राहकांचे आगमन आणि प्रस्थान, तसेच कर्मचारी आणि मॉलमध्ये येणाऱ्या वस्तू यांचे आगमन आणि प्रस्थान याकरिता स्वतंत्र व्यवस्था ठेवणे आवश्यक राहील.

XII. मॉलमधून ज्या वेळेला वस्तूंचे घरपोच वितरण केले जाणार आहे अशा वेळी संबंधित कर्मचाऱ्याचे या वितरणा अगोदर थर्मल स्क्रीनिग करणे आवश्यक राहणार आहे.

XIII. मॉल मध्ये येणाऱ्या वस्तु / माल याचा पुरवठा,हाताळणी,साठवणूक करतांना योग्य दक्षता घेणे आवश्यक राहिल तसेच रांगेवर योग्य नियंत्रण आणि निर्जंतुकीकरण योग्य पद्धतीने करण्यावर कटाक्ष असावा.

XIV. मॉल मध्ये आलेल्या ग्राहकांमध्ये सुरक्षित अंतर राखण्याकरिता प्रवेश हा नियंत्रित ठेवावा.

XV. मॉल मध्ये ज्या ठिकाणी बसण्याची व्यवस्था केलेली आहे त्या ठिकाणी दोन व्यक्तींमध्ये योग्य अंतर राहील अशी व्यवस्था ठेवावी .

XVI. उद्वाहन (Lift) चा वापर करीत असताना त्यातून जाणाऱ्या व्यक्तींची संख्या ही मर्यादित ठेवावी.

XVII. ज्या ठिकाणी स्वयंचलित सरकते जिने आहेत त्या ठिकाणी एक पायरी सोडून मगच दुसऱ्या व्यक्तीस जाण्याकरिता प्रवृत्त करावे .

XVIII. मॉल मधिल ज्या जागांवर वारंवार व्यक्तींचा स्पर्श / संपर्क होतो अशा जागा प्रामुख्याने मॉल मधिल मोकळया जागा ,दुकाना मधिल जागा,सरकते जिने, उद्वाहन (Lift),दरवाजाचे हॅडल,जिन्याचे कठडे,लिफ्टची बटणे,बेंचेस, स्वच्छतागृह मधिल नळाच्या तोट्या.ई वारंवार स्वच्छता व १% सोडीअम हायपोक्लोराइट च्या द्रावणाने निर्जंतुकीकरण करावे.

XIX. मॉल मधिल वातानुकुलित व्यवस्था यांचे व्यवस्थापन हे केंद्रीय लोक निर्माण विभाग (CPWD) यांनी नेमून दिलेल्या निकषानुसार करण्यात यावे. (Devices range should be 24-30 celsius and relative humidity should be in the range of 40-70%, intake of fresh air should be and cross ventilation should be adequate.)

XX. लोकांनी एकत्र येणे, गर्दी करणे यावर पूर्णपणे प्रतिबंध ठेवावा.

XXI. स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याचे ठिकाण आणि हात धुण्याची जागा याठिकाणी विशेष करून प्रभावी व वारंवार स्वच्छता राहील हे बघावे.

XXII. कर्मचारी किंवा ग्राहकांनी वापरलेले मास्क, ग्लोव्हज यांची योग्य प्रकारे विल्हेवाट लावण्याची व्यवस्था ठेवणे आवश्यक राहिल.

XXIII. सर्व स्वच्छतागृहांची स्वच्छता नियमितपणे ठराविक कालावधीनंतर होणे आवश्यक राहील.

XXIV. मॉलमधील मुलांना खेळण्याची जागा आणि गेम आर्केड परिसर पूर्णपणे बंद राहील.

XXV. मॉलमधील सिनेमागृहे, फुड कोर्ट / रेस्टॉरंट नागरिकांना बंद असतील मात्र फुड कोर्ट / रेस्टॉरंट मधिल तयार पदार्थाची त्याच्या मार्फत घरपोच सेवा देता येईल .

XXVI. मॉलमध्ये कुठल्याही व्यक्ती बद्दल कोरोना विषयक लक्षणा बाबत संशय आल्यास किंवा खात्री झाल्यास अशा व्यक्तीला ताबडतोब अन्य व्यक्तीपासून दूर असलेल्या एका स्वतंत्र खोलीत ठेवावे. सदरच्या व्यक्तीची डॉक्टरांनी तपासणी करेपर्यंत तिच्या चेहऱ्यावर मास्क किंवा फेस शिल्ड ठेवणे आवश्यक राहील.

याबाबत तात्काळ जवळच्या मनपाच्या दवाखान्यात संपर्क साधावा,संबंधित आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्याने त्याची तपासणी केल्यानंतर आवश्यकता असल्यास अशा रुग्ण व्यक्तीच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींना संपर्क करावा आणि त्यांची पण आरोग्य विषयक तपासणी करून घ्यावी तसेच अशा व्यक्तीने वापरलेल्या जागा तात्काळ निर्जंतूक करून घ्याव्यात.

तसेच अशा व्यक्ती ज्या ठिकाणी आढळल्या तो परिसर पूर्णपणे निर्जंतुकीकरण करून घ्यावा.